


कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे

साप्ताहिक

# क्रांतिवीर

संपादक-मोहन गुंड

skrantiveer66@gmail.com

**क्रांतिवीर**

बीड जिल्ह्यात तालुका,शहर प्रतिनिधी नेमणे आहेत, इच्छुकानी संपर्क साधावा

मोबा.९४२३९७९४९२

वर्ष १२ वे अंक ५३ वा | सोमवार,दि.१६ जुन २०२५ | RNI.No.MHMAR/ 2013/50191 | पाने ४ | किंमत १ रुपये

# हिंदी भाषा शक्ती करून भाजप हा महाराष्ट्र द्रोही पक्ष आहे हे सिद्ध झाले:प्रसाद साळवी

**सर्वांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्राची चळवळीच्या पद्धतीने रस्त्यावर उतरू - शेतकरी कामगार पक्षाचे आव्हान**

**अशोक सराफ, सचिन पिलगांवकर, मोहन जोशी,प्रिया बेर्डे, अश्विनी भावे, निशिगंधा वाड, भारतरत्न सचिन तेंडुलकर हिंदी भाषा शक्ती विरोधात गप्प काड**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा मराठी भाषा आणि संस्कृती संपवत आहेत**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या राजमुद्रेसाठी संस्कृत भाषा वापरली. पण स्वराज्याचा कारभार त्यांनी मराठी भाषेत सुरू केला हे केंद्र आणि राज्य सरकार ला माहित नाही म्हणून नरेंद्र मोदी, अमित शहा, भाजप आमदार आणि खासदार यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे विचार कळले नाही. म्हणून तर महाराष्ट्र वर भाजप चे प्रेम नाही हे त्यांनी दाखवून दिले आहे शेकाप जिल्हा अध्यक्ष प्रसाद साळवी यांनी म्हटले. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. ती केवळ इतर भारतीय भाषांप्रमाणेच एक राज्यभाषा असून हिंदी भाषा शक्ती करणे अयोग्य आहे. महाराष्ट्राची राज्य भाषा मराठी मग एक फुल दोन हाफ सरकार जबरदस्तीने हिंदी शक्ती का करत आहेड पहिलीपासून हिंदी शिकवावी असं राष्ट्रीय शिक्षण धोरणात कुठे म्हटलं आहे? भाजप आणि देवेंद्र फडणवीस जी खोटे बोलत आहेत. सोबतचा दुवा पहावा. https://education.gov.in/sites/uploadšfiles/mhrd/files/NEPšFinalšEnglishš0.pdf

देवेंद्र फडणवीस सरकारने राज्य मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या मराठी आणि हिंदी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी ही तिसरी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय मागे घेतला होता. मात्र त्यानंतर अनिवार्य शब्द काढून इच्छुक विद्यार्थ्यांसाठी भाषा शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे आणि शेतकरी कामगार पक्षाचे प्रमुख भाई जयंत पाटील यांनी ताबडतोब विरोध दर्शवला आहे हिंदीची सक्ती करताना विचारात घेतलेले नाही, ही तर सरळ सरळ हुकूमशाहीच झाली असा घणाघात भाई जयंत पाटील यांनी स्पष्ट म्हटलं आहे तसंच शेकाप तर्फे महाराष्ट्रव्यापी तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.महाराष्ट्राच्या जनतेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी १००% जबरदस्तीने हिंदी सक्ती करून शेंडी लावण्याचा प्रयत्न केला आहे. देवेंद्र फडणवीस तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात की नरेंद्र मोदी, अमित शहा, भाजप, ठ्ड्ड, गुजरात चे गुलाम आहात ?

तुम्हाला महाराष्ट्र विषयी, मराठी भाषा, मराठी माणसा विषयी प्रेम नाही आणि मराठी चा अभिमान नाही आहे असे दिसते.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हिंदी भाषा शक्ती विरोधात शिवसेना वर्धापन दिनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देतील अशी अपेक्षा होती पण ते ही गप्प. शिवसेना कडे शिक्षण मंत्री पद आणि हि जबाबदारी श्री दादा भुसे यांच्याकडे पण त्यांनी हिंदी शक्ती चा निर्णय कशा लागू करून दिला ? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक निक एवढा कमजोर कशा असू शकतो ? आज सन्मानीय बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी एकनाथ शिंदे आणि दादा भुसे यांचा ठाकरे स्टाईल मध्ये चिरफाड करून चांगलाच समाचार घेतला असता शेकाप चे प्रसाद साळवी ने सांगितले.

**मराठी भाषा**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे ही हिंदी भाषा शक्ती त्यांना मान्य आहे म्हणून ते गप्प आहेत. त्यांना फक्त सत्ता आणि सत्तेत राहून फक्त पैसा कशा मिळवायचा हाच त्यांचा विचार आहे.मराठी भाषा आणि संस्कृती वरील हल्ला परतवून लावण्यासाठी मराठी चित्रपट - नाटक चे कलाकार, दिग्दर्शक, निर्माते हिंदी भाषा शक्तीच्या बाबतीत गप्प का ? अशोक सराफ, सचिन पिलगांवकर, मोहन जोशी,प्रिया बेर्डे, अश्विनी भावे, निशिगंधा वाड आणि ईतर हिंदी भाषा शक्ती विरोधात कधी बोलणार ? भारतरत्न सचिन तेंडुलकर हिंदी भाषा शक्ती विरोधात आपण महाराष्ट्राच्या मैदानाच्या पिचवर कधी सक्रिय होणार ? तुमचा मराठी बाणा मेला ? शेकाप चे प्रसाद साळवी यांनी मराठी जवाबदारी दाखवून दिली.मराठी भाषा ही आपली आई आहे आणि संस्कृती आहे, या वाक्याचा अर्थ आहे की मराठी भाषा आपल्यासाठी आईसमान आहे. मराठी आपली मातृभाषा आहे आणि आपण तिच्यातच वाढलो, बोललो, आणि विचार करायला शिकलो. त्यामुळे, मराठी भाषेला आईप्रमाणे आदर आणि प्रेम देणे महत्वाचे आहे. आपले राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी ही स्वराज्याचा कारभार त्यांनी मराठी भाषेत सुरू केला. मराठी भाषा आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाची आहे. ती आपली ओळख आहे आणि आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. मराठी भाषेमुळे आपण महाराष्ट्राची ओळख जगाला करून देतो हे छत्रपती शिवरायांनी दाखवून दिलं आहे, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हे लबाडी करून आपली मराठी भाषा आणि संस्कृती हिंदी भाषेची शक्ती करून संपवत आहेत म्हणून त्यांचा हुकुमशाही च्या विरोधात प्रत्येक मराठी माणसाने लढण्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले पाहिजे शेकाप जिल्हा अध्यक्ष प्रसाद साळवी यांनी म्हटले.भाजप च्या हिंदी भाषा शक्ती विरोधात त्यांची हुकूमशाही थांबवण्यासाठी लवकरात लवकर शेकाप,माकप, शिवसेना, मनसे, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, सार्वजनिक मित्र मंडळ व मराठी भाषा प्रेमी यांनी सर्वांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळच्या पद्धतीने रस्त्यावर उतरून लढा लढावा पाहिजे. भाषावार प्रांत रचना आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीकरिता, संयुक्त महाराष्ट्र समितीने दिलेल्या अविस्मरणीय संघर्षात, शेतकरी कामगार पक्ष अग्रभागी राहिला असून, मराठी ही आमची मातृभाषा तर आहेच परंतु ती महाराष्ट्राची राजभाषा आणि महाराष्ट्राची अस्मिता आहे, असे प्रतिपादन शेकाप कडून भाई जयंत पाटील यांनी केले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील शेकाप चा फार मोठा इतिहास आहे म्हणून हिंदीची सक्ती शेतकरी कामगार पक्ष खपवून घेणार नाही शेकाप कडून प्रसाद साळवी यांनी आक्रमक भूमिका मांडली.

# रानडुकराच्या हल्ल्यात जखमी शेतकऱ्याचा अखेर मृत्यू

## रान डुकरांचा बंदोबस्त करण्याची शेतकऱ्यांची मागणी

माजलगाव ( प्रतिनिधी ) शेतात जात असताना अचानकपणे रानडुकराने जोरदार धडक दिल्याने जखमी झालेल्या तालुक्यातील देपेगाव येथील शेतकरी श्रीकिसन रंगराव काळे (५८) यांचा बीड येथे उपचार सुरू असताना मृत्यू झाल्याची घटना घडली.



माजलगाव तालुक्यातील देपेगाव येथील शेतकरी श्रीकिसन काळे हे मागील पंधरा दिवसापूर्वी सकाळी नऊच्या सुमारास आपला मुलगा अमोल याच्यासह शेतात आंबे आणण्यासाठी गेले असताना अचानक् शेतातून समोर आलेल्या रानडुकराने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. या हल्ल्यात श्रीकिसन यांच्या पोटात जबर वार बसला व त्यांच्या आतड्यास इजा झाली. यावेळी अमोल याने आरडाओरडा केल्याने रानडुक्कर पळून गेले, त्यानंतर जखमी श्रीकिसन यांना तातडीने माजलगाव येथील खासगी हॉ स्पिटलमध्ये प्राथमिक उपचार करून बीड येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर पंधरा दिवस उपचार केल्यानंतर उपचार सुरू असताना अखेर त्यांचा दि १८ जून रोजी मृत्यू झाला. त्यांच्यावर देपेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत शेतकरी श्रीकिसन काळे यांच्या पश्चात पत्नी, पाच मले. सना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मयत काळे यांच्या कुटुंबाला शासनाने नियमा प्रमाणे आर्थिक मदत करावी अशी मागणी गावकऱ्यांच्या कडून होत आहे

दरम्यान या परिसरात रानडुकरांची संख्या झपाट्याने वाढत असून या रान डुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे

# धारूर घाटात अपघात;परभणी येथील दोघे गंभीर जखमी

धारूर /प्रतिनिधी

धारूर घाटात सातत्याने अपघात होत आहेत आजवर या घाटात शेकडो अपघातात अनेकांचे बळी गेले आहेत.(ता २२)रोजी सकाळी परभणी येथील एम एच २२ ए डब्लू वेणू गाडी लातूर वरून परभणीला जात असताना धारूर घाटात वळणाचा अंदाज न आल्याने ३०० ते ४०० फूट खोल दरीत कोसळली या अपघातात परभणी येथील भीमराव घायाळ(वय५८),संदीप घायाळ(वय ५६) हे गंभीर जखमी असून उपचारासाठी बीड येथे नेण्यात आले आहे.

शहराच्या पश्चिमेस तीन किमी अंतराचा अरुंद व करळ नागमोडी घाट असून या घाटात सुरेक्षेच्या दृष्टीने कुठल्याच उपाययोजना नसल्याने या घाटात सातत्याने अपघात होत आहेत.(ता.२२) रोजी सकाळी ९ च्या सुमारास लातूर वरून परभणी कडे जाणाऱ्या एम एच २२ ए डब्लू २३६५ वेणू गाडी चा धारूर घाटातील मसोबा मंदिराजवळ तीव्र उताराला नागमोडी वळणावर चालकाला रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघात झाला. रस्त्याच्या बाजूला संरक्षण कठडे नसल्याने गाडी ३०० ते ४०० फूट खोल असलेल्या दरीत कोसळली या अपघातात परभणी येथील दोन गंभीर जखमी झाले असू पुढील उपचारासाठी बीड या ठिकाणी नेण्यात आले आहे. घाटात मोबाईल चे टॉवर नसल्याने वैधकीय सेवेशी संपर्क होऊ शकत नाही परिणामी अपघात ग्रस्तना वेळेवर मदत न मिळाल्याने जीव गमवावा लागतो रस्ते विकास महामंडळाच्या वतीने या ठिकाणी आपत्कालीन वेळेत मदतीसाठी फोन पोल बसवला आहे मात्र तो रिकामाच सापळा आहे.

# वाल्मीक कराडची प्रकृती बिघडली; वैद्यकीय पथक जेलमध्ये दाखल

बीड/प्रतिनिधी



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडची बीड तुरुंगात प्रकृती बिघडली आहे. त्याची तुरुंगातच वैद्यकीय पथकाकडून तपासणी करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, कराडला शुगर आणि कमी रक्तदाबाचा त्रास जाणवत आहे. सध्या वैद्यकीय पथक त्याच्यावर लक्ष ठेवून आहे आणि तब्येतीत अधिक बिघाड झाल्यास त्याला रुग्णालयात दाखल केले जाण्याची शक्यता आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून वाल्मीक कराड ओळखले जातात. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांच्यावर मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचा दबाव निर्माण झाला होता. अखेरीस त्यांनी प्रकृती कारण पुढे करत मंत्रिपदाचा राजीनामा दिला. दरम्यान, वाल्मीक कराडला कठोर शिक्षा व्हावी यासाठी या प्रकरणाचे वकीलपत्र प्रसिद्ध सरकारी वकील उज्वल निकम यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.वाल्मीक कराडला बीडच्या तुरुंगात व्हीआयपी ट्रिटमेंट दिली जात असल्याचा आरोप निलंबित पीएसआय रणजित कासले यांनी केला आहे. कासले यांनी सांगितले की, कराडसाठी तुरुंगात विशेष सुखसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याला झोपण्यासाठी अतिरिक्त पांघरूण दिले जाते, चहा पिण्यासाठी वेगळा कप वापरतो, तसेच इतर कैद्यांच्या नावावर तो रेशन घेतो. कराडवर खरोखर कारवाई करायची असेल, तर त्याची तात्काळ दुसऱ्या तुरुंगात रवानगी करावी, अशी मागणी कासले यांनी केली आहे.

### २४ जून रोजी पुढील सुनावणी

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीड येथील विशेष मकोका न्यायालयात १७ जून रोजी होणार होती. मात्र, न्यायाधीश रजेवर गेल्यामुळे ती सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे न्यायालयाने पुढील तारीख २४ जून निश्चित केली आहे. आता अवघ्या दोन दिवसांनंतर, मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

# लोकलढा पाणी आंदोलनास भगवानगडचा आशीर्वाद

## महंत नामदेव महाराज शास्त्री, समन्वयकांनी मांडली भूमिका

बीड, प्रतिनिधी

जायकवाडीच्या पाण्यासाठी १४० गावांनी एकत्र येत जे लोकलढा आंदोलन उभे केले आहे, हे शेतकरी व ग्रामस्थांच्या पिढ्यानपिढ्या कल्याणाचे आंदोलन आहे,या आंदोलनास श्री क्षेत्र भगवान गडचे आशीर्वाद असल्याचे प्रतिपादन महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी केले. लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी महंत नामदेव महाराज शास्त्री यांची भेट घेऊन भूमिका मांडली यावेळी महंत नामदेव महाराज शास्त्री बोलत होते.



यावेळी बाबुराव जेठे, राजाभाऊ महाराज कुटे, विठ्ठलराव शेळके, पोलीस पाटील काशीनाथ जोगदड, माजी सरपंच लक्ष्मण तात्या नागरगोजे, शिवहारी नागरगोजे, चेअरमन भाऊसाहेब जोगदंड, विजयकुमार करपे पाटील, शामराव घुगे, गोविंद माने, बालासाहेब शेरकर, गणेश जाधव, पत्रकार संतोष भारती, राहुल लोंढे, रामेश्वर पवळ, अण्णासाहेब देवगुडे मामा, रामचंद्र पाटील चव्हाण, बाबासाहेब नागरगोजे, शंकर पटुळे व समन्वयक दिनेश गुळवे यांची उपस्थिती होती. महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी चर्चा करताना लोकलढा आंदोलनाचे समन्वयक म्हणाले, की जायकवाडी धरणाच्या पाण्याशिवाय शिरूर, मातोरी, चकलांबा ते तालखेड, एकदरा पर्यंतच्या पाण्यापासून वंचित असलेल्या भागाचा विकास होणार नाही. शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, स्थलांतर, शेतकर्यांच्या मुलांचे लग्न, गर्भाशय काढणे असे सामाजिक प्रश्न दूर करून शेतकर्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी लिफ्ट करून भगवान गडाच्या पायथ्याशी सोडणे गरजेचे आहे, भगवान गड ते तारखेपर्यंत उपकालवा करावा, सिंदफणात पाणी सोडून साखळी बंधारे करावेत या योजना करणे गरजेचे आहे.

यासाठी शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव व वडवणी तालुक्यातील गावांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. यावर बोलताना महंत नामदेव महाराज शास्त्री म्हणाले, की शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असलेल्या या आंदोलनास भगवानगडचा आशीर्वाद आहे. या मागण्यांसाठी जी मदत लागेल, ती संपूर्ण मदत आपण करू, असेही महंत नामदेव महाराज शास्त्री म्हणाले. महंतांनी पूर्ण सहकार्याचे आशीर्वाद दिल्याने लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी महंतांचे आभार मानले.


### महंतांच्या आशीर्वादाने लोकलढ्यास बळ-लोंढे

सर्वसामान्य कुटुंबातील तरूण व शेतकरी यांनी आपल्या भागातील शेती बारामती पॅटर्न प्रमाणे बारमाही पाणीदार करण्यासाठी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या लोकलढ्यास महंत शिवाजी महाराज, महंत नामदेव महाराज शास्त्री, उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्यासह साधुसंत, वारकरी संप्रदायातील अधिष्ठाण असलेले व्यक्ती यांचे आशीर्वाद मिळाले आहेत. महंतांच्या आशीर्वादामुळे या लोकलढा आंदोलनास बळ मिळाल्याचे मत समन्वयक राहुल लोंढे यांनी व्यक्त केले.

# धारूर घाटात कार कोसळली, दोघे गंभीर जखमी

धारूर /प्रतिनिधी

धारूर घाटातील अरुंद रस्ता आणि निकामी संरक्षण भिंतीमुळे अपघातांची मालिका थांबायचे नाव घेत नाहीये. रविवारी (दि. २२ जून) सकाळी सुमारास धारूरहून माजलगावकडे जाणारी कार घाटातील एका वळणावरून थेट ३०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात कारमधील दोघे सख्खे भाऊ गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त कार ही हुंडाई कंपनीची असून तिचा क्रमांक एमएच २२ डब्ल्यू २३६३ असा आहे. कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने आणि रस्त्यालगत असलेली संरक्षण भिंत निष्क्रिय झाल्याने ही कार खोल दरीत कोसळली. अपघातात भीमराव पायाळ (वय ५८) आणि संदीप पायाळ (वय ५६) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.



अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी दोघांनाही धारूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात केले. जखमींना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.धारूर घाटातील रस्ता अरुंद असून संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या भिंती अनेक ठिकाणी निकामी झाल्या आहेत. यामुळे अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

# संपादकीय

## एक झाड होते

मुळात वन खात्यात कार्यरत असलेल्या एखाद्या वनाधिकाऱ्याचे कर्तव्य नेमके काय? जंगलात राहणाऱ्या आणि त्याच वेळी त्यास दुरून न्याहाळणाऱ्यांच्या मनात जंगलाविषयी ममत्व निर्माण करणे. नियमांच्या चौकटीत जगणाऱ्यांस ते करता येत नाही. त्यासाठी लेखनाचा मार्ग निवडणारे मारुती चितमपल्ली हे एकमेव म्हणावे असे. ब्रिटिश काळातील जिम कॉर्बेट हे असा मार्ग स्वीकारणाऱ्यांतले मोठे नाव. ते आजही सर्वत्र आदराने घेतले जाते. नेमका तसाच आदर व प्रेम चितमपल्ली यांना त्यांच्या हयातीतच वाचक, चाहत्यांकडून मिळाले. तेलगू आणि कन्नड अशी संमिश्र भाषा असलेल्या सोलापूरच्या लोकवस्तीत लहानाचा मोठा झालेला हा तरुण उदरनिर्वाहासाठी नोकरी असावी म्हणून वन खात्यात परिक्षेत्राधिकारी म्हणून रुजू झाला तेव्हा अशी काही साहित्यसेवा आपल्या हातून घडेल याचे स्वप्नही त्याने बघितले नव्हते. नोकरीच्या निमित्ताने सुमारे तीन दशके विदर्भात घालवणाऱ्या चितमपल्लींना जंगल वाचायला शिकवले ते नवेगाव बांधच्या माधवराव पाटील डोंगरवारांनी. मराठी सारस्वतांच्या वर्तुळाला निसर्गाची ओळख करून देणाऱ्या व्यंकटेश माडगूळकर, माधवराव व चितमपल्ली या त्रिकुटाने नंतर केवळ निसर्गच नाही तर जंगल, त्यात राहणारे पशुपक्षी, प्राणी, झाडे यांना बोलते करण्याची किमया त्यांच्या लेखनातून साधली. माधवराव तसे गावकुसात रमणारे. लिहिण्याचा छंद नसलेले पण अनुभवाची मोठी पोतडी उराशी बाळगून असलेले. याच अनुभवांना शब्दरूप देत तर अनेकदा स्वत: जंगलात भटकंती करून अनुभूती घेत चितमपल्लींनी जंगलाचे मोहक रूप त्यांच्या लेखनातून प्रत्येकाच्या दिवाणखान्यात आणून ठेवले. त्यांच्या 'पाखरमाया' या पुस्तकात एक वाक्य आहे. ''जंगलातल्या देवळासमोरच्या पिंपळाची सळसळ अगदी अंगाई गीतासारखी वाटते. त्या सळसळीतून उमटणारा घोषनाद चांदीच्या किणकिणाऱ्या घंटेसारखा वाटतो''. इतकी अचूक निरीक्षणे योग्य शब्दांचा वापर करून वाचकांपर्यंत पोहोचवणे हे तसे जिकिरीचे काम, पण चितमपल्लींनी ते लीलया पेलले. नदी, नाले, वृक्ष यांचे नाते थेट संस्कृतीशी जोडलेले असते. ते ओळखायला शिकले की अवघा निसर्गच आपलासा वाटू लागतो असे सतत सांगणारे चितमपल्ली संस्कृतीचे कृतिशील वाहक होते.

नोकरीच्या निमित्ताने ते ज्या ज्या ठिकाणी राहिले तेथील जंगलांची त्यांनी नव्याने ओळख करून दिली. त्यांची ग्रंथसंपदाही भरपूर. तिने वाचकांना वेड लावलेच, पण त्यांचे खरे काम कोशनिर्मितीचे. सरकारी पातळीवर होणारी विश्वकोशाची निर्मिती अनुदान, अभ्यासकांचा गट, सुसज्ज कार्यालये यातून होत असताना चितमपल्ली आयुष्यभर एकटेच वेगवेगळ्या कोशांच्या निर्मितीत मग्न राहिले. ना त्यांनी त्यासाठी कधी सरकारकडे अनुदान मागितले ना कधी लेखन सहाय्यासाठी मनुष्यबळ. सुमारे ४५० प्रजातींच्या पक्ष्यांची माहिती देणारा त्यांचा पक्षीकोश आजही अभ्यासकांना प्रेरणा देतो. त्यांचा प्राणी आणि वृक्षकोशही तयार आहे. पण तो प्रकाशित झाला नाही. ही मराठी साहित्य जगताची शोकांतिकाच म्हणायला हवी. तरीही उमेद न सोडता ते मत्स्यकोशाच्या तयारीला लागले होते. निवृत्तीनंतरचे अख्खे आयुष्य स्वत:ला लेखनात रमवून घेणारा हा एकांडा शिलेदार सारस्वतांच्या वर्तुळात काहीसा उपेक्षित राहिला, हे खेदाने का होईना, पण नमूद करावे लागते. पण सोलापूरला झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष म्हणून निवडून आले, ही त्या उपेक्षेची काहीशी भरपाईच म्हणायची.

मराठी साहित्याला सुमारे एक लाख नवे शब्द देणारा हा अरण्यऋषी चिंतन, मनन, लेखन यात अखेरच्या श्वासापर्यंत रमला. त्यांच्याकडे असलेली १५ हजार ग्रंथांची संपदा पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाने अथवा भांडारकर प्राच्य विद्या संस्थेने न्यावी म्हणून त्यांनी अलीकडे बराच पत्रव्यवहार केला. पण त्यालाही फारशी दाद मिळाली नाही. यातही नवीन असे काहीच नाही. रा. चिं. ढेरे यांच्या निधनानंतर त्यांच्या ग्रंथसंग्रहाबाबतही अशीच उदासीनता दिसून आली होती. सांस्कृतिक पातळीवर आपण किती अक्षरशत्रू आहोत ते कळते ते यातूनच. शासकीय सेवेत असतानाही त्यांच्या वाट्याला अनेकदा उपेक्षा आली. वन खात्यावर वर्चस्व आहे ते भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांचे. काहींचा अपवाद वगळला तर कुणीही चितमपल्लींच्या कार्याची म्हणावी तशी दखल घेतली नाही. अशा वेळी मराठी संस्कृतीशी नाते सांगणाऱ्या राज्यकर्त्यांनी पुढे येणे गरजेचे होते, पण नोकरशाहीच्या प्रेमात असलेल्या राज्यकर्त्यांनीही त्यांच्याकडे कानाडोळाच केला. या खात्यात नव्याने दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना चितमपल्लींच्या तालमीत तयार करावे, चितमपल्लींच्या अनुभवाचा वापर करून घ्यावा, चितमपल्लींना पुढच्या पिढीतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी बोलवावे असेही यापैकी कोणालाही वाटले नाही. असो.

'पद्माश्री' हा सन्मान स्वीकारून परतल्यापासून त्यांची प्रकृती खालावत गेली. त्याआधी पत्नीचे अकाली निधन, मुलीचा मृत्यू यामुळे चितमपल्ली एकटे पडले होते. पण विदर्भातील जंगलांवर त्यांचे इतके प्रेम होते की त्यांचा विदर्भातून पाय निघत नव्हता. त्यामुळे तेव्हाचे मनुष्यबळ खात्याचे मंत्री प्रकाश जावडेकर यांनी सलग तीन वर्षे त्यांची व्यवस्था वर्ध्याच्या हिंदी विद्यापीठात केली. पण जावडेकर पदावरून जाताच चितमपल्लींपुढे कुठे राहायचे हा प्रश्न निर्माण झाला. शेवटी वयोमानामुळे त्यांना त्यांचा आवडता विदर्भ, त्यातली जंगले सोडून सोलापूरमधील नातेवाईकांकडे येऊन राहावे लागले.

# पंढरीच्या वारीत संविधानाची दिंडी

नाचत जाऊ त्याच्या गावा रे
खेळीया सुख होईल विसावा !

असे गात लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. जात धर्म पंथाचा विसर पडून आपण सर्वजण वारकरी आहोत अशी भावना पंढरीच्या वाटेवरील प्रत्येक वारकऱ्यांच्या मनामध्ये असते. कुणी कुणाला जात विचारत नाही, धर्म विचारात नाही, स्त्री आहे की पुरुष आहे असा भेद उरत नाही, असं एकच ठिकाण म्हणजे ती पंढरीची वारी! म्हणजे माणूसपणाचा निखळ अविष्कार इथे पहायला मिळतो. या वारीमध्ये एक अनोखी दिंडी गेली सात वर्ष सहभागी होते ती म्हणजे संविधान समता दिंडी!!!

संविधान समता दिंडी बद्दल अनेकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. जिथे फक्त नामाचा गजर केला जातो, भजन होतं, कीर्तन होतं, संपूर्ण अध्यात्मिक वातावरण असतं तिथे ही संविधान समता दिंडी कशी? असा प्रश्न अनेकांना पडतो. धार्मिक दिंडीमध्ये या संविधान समता दिंडीचं काय काम आहे? असा प्रश्नही विचारणारे अनेकजण आहेत.

संविधान समता दिंडीची सुरुवात कशी झाली याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता आहे. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे वारकरी संप्रदाय खरंतर कोणताही भेद मानत नाही, परंतु गेल्या काही वर्षात समतेचा विचार मांडणाऱ्या वारकरी संप्रदायामध्ये विषमतेची विषारी बीजे रुजवण्यात आली आहेत. त्यामुळे त्याचे पडसाद कीर्तनातूनही उमटू लागले आहेत. विशेषता जे तरुण कीर्तनकार वारकरी आहेत यांच्या मनामध्ये धार्मिक उन्माद निर्माण करण्यात आला आहे. ज्या वारकरी संतांनी

यातायाती धर्म नाही विष्णू दासा श्र

असं ठणकावून सांगितलं, त्याचं संतांचा अभंग कीर्तनाला घेऊन धर्मासाठी लढले पाहिजे, धर्म वाढवला पाहिजे त्यासाठी मरायला आणि मारायला तयार राहिलं पाहिजे, अशी चिथावणीची भाषा केली जाते. खर तर वारकरी परंपरा ही समतावादी आहे, परंतु समतेचा विचार घेऊन चालणाऱ्या मंडळींनीही वारकरी संप्रदायाकडे दुर्लक्ष केलं. दिंडी सोहळा अध्यात्मिक आहे, देवाधर्माचा आहे अशी भावना मनामध्ये ठेवून या अत्यंत महत्त्वाच्या प्रबोधनाच्या चळवळीकडे पाठ फिरवली. अगदी स्पष्ट सांगायचं झालं तर स्वतःला पुरोगामी म्हणवणारी ही मंडळी या संत विचारापासून दूर गेली. परिणामी प्रतिगामी आणि विषमतावादी मंडळींनी या समतावादी वारकरी संप्रदायामध्ये घुसखोरी करून इथे विषमतेचा विचार पेरायला सुरुवात केली. हे सर्व लक्षात आल्यानंतर काही संविधान प्रेमी



मंडळींनी पुन्हा या वारकरी संप्रदायाशी जोडून घेण्याची प्रक्रिया सुरू केली. त्यातूनच बारा वर्षांपूर्वी एक दिवस तरी वारी अनुभवावी असा उपक्रम सुरू झाला. यामध्ये समता मानणारी मंडळी एक दिवस या वारी चालू लागले.

पुढे वेगवेगळ्या मंचावर संविधानाबद्दल वेगवेगळ्या अंगाने चर्चा होऊ लागली. अगदी कीर्तनातूनच सविधान हे हिंदू धर्माविरुद्ध केलेलं कारस्थान आहे, असे सांगितले जाऊ लागलं. तर काही लोक संविधानापेक्षा मनुस्मृती श्रेष्ठ आहे अशी मांडणी करू लागले. दिल्लीतील काही संविधान विरोधकाने तर थेट संविधान जाळून त्याच्या क्लिप्स लोकांच्या मोबाईलवर पाठवल्या, अशी संविधानाची बदनामी केली जात असताना हे संविधान मानवी जीवनाला कसे उपयुक्त आहे आणि ते संत विचारावर कसं आधारित आहे हे सागितलं पाहिजे. म्हणून संविधानाला ७० वर्षे पूर्ण होत असताना २६ नोव्हेंबर २०१९ ते २६ जानेवारी २०२० यादरम्यान संविधान आणि संत साहित्य हे कसं परस्पर पूरक आहे याची मांडणी करणारे ७० कीर्तन करण्याचा संकल्प मी केला होता. त्यावेळेला संविधान संवादक चळवळ, संविधान प्रचारात चळवळ, संविधानाचे अभ्यासक या सर्वांनीच ही संविधान कीर्तन करण्यासाठी मला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सहकार्य केलं.

पुढे हा विचार अधिक लोकांपर्यंत जाण्याची गरज वाटू लागली. त्यातूनच सात वर्षांपूर्वी संविधान समता दिंडीची संकल्पना पुढे आली. एक दिवस तरी वारी अनुभवावी याची तयारी सुरू झाली तेव्हा पंढरपूरच्या वारीमध्ये मोठा वारकरी समुदाय असतो त्यांच्यासमोर हा विषय गेला पाहिजे अशी चर्चा सर्वांनी मिळून केली. त्यातूनच संविधान समता दिंडीचा जन्म झाला. संविधान समता दिंडी आणि एक दिवस तरी वारी अनुभवावी या उपक्रमामध्ये संविधानाबद्दल आस्था असणाऱ्या वेगवेगळ्या संस्था संघटना एकत्र आल्या. ज्यात राष्ट्रसेवा दल, लेक लाडकी अभियान, राष्ट्र सेवादल, मासूम युवा, अनुभव शिक्षा केंद्र, संविधान प्रचारक संविधान संवादक चळवळ या सर्व संस्था संघटनांनी एकत्र येऊन ही दिंडी सुरू केली.

आषाढीची वारी जवळ येऊ लागते तेव्हा वारकऱ्यांना पंढरपूरचे वेध लागतात तसेच गेली सात वर्ष आम्हाला संविधान समता दिंडीचे वेध लागतात. हा सगळा उपक्रम यशस्वी करण्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते शरद कदम, लेक लाडकी अभियानच्या वर्षा देशपांडे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे माजी अध्यक्ष अविनाश पाटील, विद्यमान अध्यक्ष माधव बावगे दत्ता पाखरे, विशाल विमल, साधना शिंदे, नागेश जाधव, दीपक देवरे, सरस्वती शिंदे सुमित, भारत घोगरे गुरुजी, समाधान महाराज देशमुख असे असंख्य कार्यकर्ते यांच्या तयारीला लागतात. संविधान समता दिंडीचा प्रस्थान सोहळा समता भूमी भिडे वाडा पुणे येथे होतो. संविधानाचे मूल्य आणि संतांचे अभंग ओव्या याचा परस्पर असणारा संबंध दर्शवणारे पोस्टर्स बॅनर पत्रक तयार होतात. संतांच्या अभंग, ओव्या आणि संविधान मूल्यांनी सजलेला संविधान रथ तयार होतो. पुण्यातून जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या दिंडीमध्ये सहभागी होतो. पंढरपूरमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मठामध्ये या संविधान समता दिंडीचा समारोप होतो. या दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी, दुपारच्या विसाव्याच्या ठिकाणी संविधानाची मूल्य आणि संत विचार सांगणारी पत्रकं वाटली जातात. बॅनरचे प्रदर्शन लावले जाते. कार्यकर्ते पथनाट्यातून, गीतातून संविधानाचे मूल्य आणि संविधानाचे महत्त्व वारकऱ्यांना समजून सांगतात. तर मी स्वतः संध्याकाळी एखाद्या दिंडी समोर संत साहित्यातील संविधान मूल्य या विषयावर प्रवचन करून संतांनी मांडलेले विचार आणि संविधानातील मूल्य हे एकच कसे आहेत हे वारकऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करतो. त्याला वारकऱ्यांच्या मधून खूपच चांगला प्रतिसाद मिळतो. दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी या संविधान समता दिंडीला नवे कार्यकर्ते जोडले जात आहेत. संविधानाचा सांगावा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संविधान समता दिंडी हे माध्यम ठरत आहे आणि त्याला चांगला प्रतिसाद लाभत आहे. या दिंडीमध्ये आतापर्यंत महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी अभिनेत्री मधुरा वेलणकर सुहिता थत्ते शाहीर संभाजी भगत, पत्रकार रवींद्र पोखरकर मुकेश माचकर, तुळशीदास भोईटे संध्या नरे – पवार या सहभागी झालेले आहेत. गेल्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार संपूर्ण कुटुंबासह बारामती येथे सहभागी झाले होते. प्रस्थान सोहळ्याला ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मुख्य चोपदार राजाभाऊ महाराज, जेष्ठ कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज वाबळे कैकाडी महाराज मठाचे प्रमुख भारत जाधव यांचे मार्गदर्शन मिळते. संतांनी पाहिलेल्या आनंदी समाजाचे स्वप्न हे संविधानाच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकते हा विश्वास समाजात निर्माण करण्यासाठी संविधान समता दिंडी हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे असे मला वाटते

म्हणून ही दिंडी अखंड चालू राहावी अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे.

– ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर

# खोटे जग ,खोटी माणसे



खोटे जग म्हणजे या जगातील व्यवस्था ( aMZm structure ) खोटी,आणि अशा जगातील माणसे पण खोटीच.याचा अर्थ काय घ्यावा ? जगाची रचना व्यवस्था खोटी आहे म्हणून माणसे खोटी आहेत का ? की या जगातील माणसे खोटी आहेत म्हणून जग खोटे आहे,किंवा जगाची व्यवस्था खोटी आहे ? कार्ल मार्क्स म्हणतो रचनेत दोष असला की माणसात दोष निर्माण होतात,म्हणजे माणसे बिघडतात,कारण चुकीची व्यवस्था असेल तर त्यातील माणसांचा नाईलाज होतो,उदा.या जगाची आर्थिक सामाजिक व्यवस्था जर विषमतेची असेल तर माणसांचे विचार आणि वर्तन विषमतेचेच असते.जे समतेच्या विचाराचे आहेत,त्यांना पण विषमतेचे व्यवहार करायला मजबूर करतात,कारण खोटे बोलणे,चोरी करणे चुकीचे आहे ,हे माहीत असूनही नाईलाज होतो आणि त्यांना खोटे वर्तन करावेच लागतात.म्हणून खोट्या जगामुळे माणसे खोटी बनतात,वागतात.

काही लोकांचे म्हणणे असे की,खोट्या माणसामुळे च जग खोटे बनते,खोटी व्यवस्था निर्माण होते,उदा.या जागतिक स्वार्थी लोभी अहंकारी धूर्त कावेबाज लबाड ऐतखाऊ प्रवृत्तीचे, बदमाश लोकांना आपले वर्चस्व इतरांवर असावे,धनाचा संग्रह करावा,सर्वात श्रेष्ठ आपणच रहावे,बाकी कनिष्ठ असावेत,सत्ता प्रतिष्ठा आपलीच असावी, यासाठी खोटे बोलणे ,पिळवणूक अन्याय अत्याचार दादागिरी करतात ,अशा दुर्जन लोकांनीच हे खोटे जग निर्माण केले आहे,आणि अशा खोट्या जगाचे बळी सामान्य जनता आणि सज्जन पण झाले आहेत.याचा अर्थ दुर्जन दुष्ट लोकांनी ही खोटी व्यवस्था निर्माण केली,आणि या व्यवस्थेचे चालक पण तेच आहेत,तरी पण हे सुद्धा या खोट्या जगाचे बळीच आहेत,हे त्यांना समजत नाही.उदा. गरीब मध्यम श्रीमंत हे तीन वर्ग. या प्रत्येक वर्गात लोभी आणि दुष्ट प्रवृत्तीचे दुर्जन लोक असतात,( अर्थात यांची संख्या मोजकी आहे ) असे लोक चोऱ्या मारामाऱ्या करून,खोटे बोलून,इतरांची फसवणूक करून , पिळवणूक शोषण करून,दारू जुगार , तस्करी आणि अवैध असे छोटे मोठे धंदे करून गरीब हे मध्यम वर्गात आणि मध्यम हे श्रीमंत वर्गात , आणि श्रीमंत हे भांडवलदार वर्गात जाण्याची धडपड करीत असतात,खालचा वर्गाचा आदर्श हा वरचा वर्ग असतो.खालचा आदर्श नसतो,म्हणून ही खोटी ( विषमतेची ) व्यवस्था निर्माण झाली आहे. असे खोटे उपद्रवी लोकच या व्यवस्थेत ऐशरामी जीवन जगतात.आणि खरे आणि सरळ वागणारे आणि व्यवहार करणारे सामान्य आणि संखेने बहुजण लोक बिचारे पावलो पावली अपमानित गुलामीचे जीवन जगत असतात.कसे बसे या अन्यायी खोट्या जगात टिकून राहण्यासाठी हे पण खोटे बोलतात,मोठ्या नसल्या तरी छोट्या का होईना चोऱ्या मारामाऱ्या करतात. नव्हे कराव्याच लागतात,कारण खोट्या जगात संघर्ष केल्या शिवाय जगतातच येत नाही.म्हणून समोरचा माणूस खोटा असेल तर त्यास खरे बोलून त्याचे सोबत राहणे शक्य नसते,म्हणून जगच खोटे असेल तर खरा माणूस खरे वागणे शक्यच नसते.वेळ प्रसंगी खोटे बोलावेच लागते.

गांधीजींनी या खोट्या जगात पण खरे व्यवहार करता येतात,हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी त्यांच्या जीवनात अनेक प्रयोग केले,ते सारे प्रयोग सत्याचे प्रयोग हे त्यांनी त्यांचे आत्मचरित्र लिहून ठेवले आहे,प्रत्येकानी वाचावे असेच ते आहे,म्हणून मी वाचले,सत्य वागण्याचा प्रयत्न केला,त्याचा परिणाम असा झाला की,बरेच प्रकल्प हातचे गेले,जे मिळायचे ते पण मिळाले नाहीत,भ्रष्टाचारी अधिकारी आणि व्यवस्थेमुळे .म्हणून मी ठरविले की, खोट्या जगात खरे वर्तन टिकत नाही.म्हणून मी पण इतर प्रामाणिक माणसे जे करतात तेच करायला सुरुवात केली.म्हणजेच मी आणि माझे विचार खरे असूनही मला खोटे वागण्याची वेळ आली. खोट्या जगात टिकून राहायचे तर खरे वर्तन करून टिकू शकत नाही.गांधीजींना. च कसे जमले त्यावर संशोधन केले पाहिजे.

सामाजिक विषमतेची व्यवस्था आहे,म्हणजे वर्णव्यवस्था ,जातीव्यवस्था ,स्पृश्य अस्पृश्यता आहे,वरच्या जातीचे खालच्या जातीला हीन दीन हलके समजणे आणि आपण वरिष्ठ समजणे,वरिष्ठ जातीचे वर्चस्व,अपमान,गुलामी मान्य करणे,खालच्या जातीचे मालक समजणे ही मानसिकता नव्हे खोटारडेपणा या व्यवस्थेत म्हणजे जगात आहे,म्हणून तसे जगणे आहे.

याचा अर्थ आर्थिक वर्ग आणि सामाजिक प्रवर्ग आणि जाती ची विषमता ही खोट्या लोकांच्या मानसिकतेतून निर्माण झाली.खोटे म्हणजे असत्य,आणि खरे म्हणजे सत्य.आजची जगाची व्यवस्था ही खोटीच आहे,असेच म्हणावे लागेल.

धार्मिक क्षेत्राचे पण तसेच आहे.देव ,धर्म,स्वर्ग , वैकुंठ,कर्मकांड, जप तप,पूजा अर्चा,तीर्थाटन , नवस सायास, दैव भाग्य,चमत्कार, दान धर्म भंडारे , देवाचा धर्म आणि धर्माची देवळे हा सारा खटाटोप कशासाठी ? हे केल्याने काय मिळते ? खरेच मिळते का ? की ही अंधश्रधा आहे ? खरच देव आहे का ? त्याला पुरावे नाहीत,नीतिमत्तेसाठी धर्माची गरज की देवासाठी ? धर्म आणि नीतिमत्ता एक नसून प्रत्येकाचे अस्तित्व आणि अर्थ वेगळा आहे,धर्म न पाळता पण नीतिमत्ता पाळता येते.देव धर्म कर्मकांड आत्मा स्वर्ग नरक पाप पुण्य हे तर्कावर बुद्धीवर अनुभवावर प्रयोगावर विज्ञान दृष्टी शोध संशोधन या कसोटीवर टिकत नाहीत,म्हणजेच या साऱ्या गोष्टी खोट्याच आहेत,हे सिद्ध होते,तसेच या खोट्या गोष्टीमुळेच शोषण ,सत्ता,प्रतिष्ठा,संपती संग्रह टिकून आहेत,खोट्या लोकांनीच शोषण केले आहे,करीत आहेत, तेच सत्तेत आहेत,समाजात प्रतिष्ठित आहेत.हे आपण कधी समजून घेणार आहोत ? आणि अशा धार्मिक सामाजिक आर्थिक विषमतावादी व्यवस्थेमुळे आणि माणसांमुळे हे खोटे जग निर्माण झाले आहे,आणि आपण सामान्य जनता आणि बहुजन या खोट्या व्यवस्थेचे बळी आहोत,गुलाम आहोत,ही व्यवस्था कधी आणि कशी बदलणार हा खरा प्रस्न आणि चिंतेची बाब आहे,यासाठी परिवर्तनवादी लोकांनी दर आठवड्याला एकत्र येऊन सत्संगाप्रमाणे चिंतन केले पाहिजे.तरच खोट्यांचे खोटे जग उद्ध्वस्त होईल.

लेखक :
दत्ता तुमवाड नांदेड ९४२०९१२२०९

# क्रांतिसिंह नाना पाटील खासदार



क्रांतिसिंह नाना पाटील खासदार होते तेव्हाची गोष्ट आहे.ते एकदा मुंबईला निघाले होते. त्यांच्यासोबत भाळवणीचे हंबीरराव धनवडे नावाचे कार्यकर्ते होते. हे दोघे कराड रेल्वे स्थानकावर गेले.तर त्यांना समजलं गाडी निघून गेलेली आहे. दुसरी गाडी रात्री खूप उशिरा होती. ते पोहोचले तेव्हाच रात्रीचे दहा वाजले होते. आता गाडी तर गेलेली.वाट पहाण्याशिवाय पर्याय नव्हता. म्हणून ते दोघे तिथेच बसले. ते थंडीचे दिवस.कडाक्याची थंडी होती.यांच्याजवळ पांघरायलाही काही नव्हते. तशाच थंडीत ते गाडीची वाट पाहत बसले. त्या स्टेशनवर ते दोघे आणि एखाददुसरा कर्मचारी होता. बाकी सगळी शांतता होती.दरम्यान दिवसभरच्या कामाने थकून गेलेल्या हंबीररावाना झोप यायला लागली म्हणून ते बाकड्यावर कलंडले तशीच त्यांना झोप लागली. काही वेळातच ते घोरायला लागले.

साधारण दोन तासांनी स्टेशनवर वाजणाऱ्या घंटेच्या आवाजाने त्यांना जाग आली. ते एकदम उठले तर तेव्हा त्यांच्या लक्षात आले. त्यांच्या अंगावर लुंगी पांघरलेली आहे. आणि क्रांतीसिंह नाना पाटील मात्र थंडीत कुडकुडत बसले आहेत. त्यांनी त्यांच्या अंगावरील लुंगी झोपलेल्या हंबीररावांच्या अंगावर टाकली होती आणि स्वतः थंडीत बसलेले. तो प्रसंग पाहून हंबीरराव गहिवरून म्हणाले,अण्णा, अस का ओ केलंसा? माझ्या अंगावर लुंगी टाकून तुम्ही थंडीत कुडकुडत बसलाय?

हंबीरा, तु इळभर रानात राबून कटांळला हुतास. पडल्या पडल्या तू घोराय लागलास. पण ही थंड अशी. कुडकूड कराय लागलास. थंडीन झोपतच तू गळ्यापातूर गुडघ आखडून घेतलंस. मला ते बघवलं न्हाय. मग टाकली लुंगी तुझ्या अंगावर'ते ऐकून हंबीरराव यांना हुंदका फुटला. ते रडायलाच लागले.

त्यांची समजूत घालत क्रांतिसिंह म्हणाले, हंबीरा रडू नको,आर मला सवय झालीय. इंग्रज सरकारच्या विरोधात लढताना लय वाईट दिवस काढल्याती. मला थंड,वार, पाऊस सगळ्याची सवय झालीय. तू दिवसभर रानात राबून आला होतास, तुला विश्रांती मिळावी असं वाटलं मलामग नाना बोलत होते आणि हंबीरराव हुंदके देत ऐकत होते. दिवस निघून गेले. काही काळानंतर क्रांतिसिंह नाना पाटील जग सोडून गेले, हंबीरराव यांना खूप दुःख झालं.त्यानां या शोकातून बाहेर यायला बरेच दिवस लागले. नंतर ते सावरले. नानांची स्मृती जतन करण्यासाठी त्यानी त्यांच्या घराला नावं दिल'कॉम्रेड निवास'आणि बैठकीच्या खोलीत भिंतीवर क्रांतिसिंह यांच एक मोठं तैलचित्र करून घेतलं.हंबीरराव कॉम्रेड होते ,ते नास्तिक होते पण रोज सकाळी संध्याकाळी जेवताना त्या तैलचित्राचाजवळ जात, दोन हात जोडत आणि पून्हा जेवण करत. लोक त्याना म्हणत, 'तुम्ही आयुष्यभर देवाला कधी नमस्कार केला नाही आणि या फोटोला मात्र रोज हात जोडता हे कसं काय?'ते सांगत'बाबांनो,तुम्ही ज्या देवाला जाता त्यो देव तुम्ही पाहिला नाही. पण हा देव मी पाहिला आहे,त्याच देवपण मी जवळून बघितलं आहे.म्हणून या देवाच्या मी पाया पडतो'ते असे म्हणायचे आणि बोलता बोलता गहिवरून जायचे. हंबीरराव थकले त्यांनी एक दिवस त्यांच्या मुलांकडून वचन घेतलं,'माझ्या माघारी अण्णांना विसरू नका. मी जस त्यांना नमस्कार केल्याशिवाय जेवत नव्हतो तसच वागा' दिवस निघून गेले .एक दिवस वयोमान झाल्यावर हंबीरराव काळाच्या पडद्याआड गेले.आता 'कॉम्रेड निवास' तसेच आहे.बैठकीच्या खोलीत असणारा क्रांतिसिंह नाना पाटील यांचा फोटो दुरून दिसतो. सकाळी जेवणाची वेळ झाली की त्या घरातील कर्ता माणूस त्या फोटोसमोर येतो. फोटोचे दर्शन घेतो आणि मगच जेवतो. हंबीरराव धनवडे यांनी मुलाला दिलेलं वचन आजही त्या घरात पाळलं जातंय. उद्याही त्यांची नातवंड ही जित्या देवाची आठवण जागवतील. आजोबांनी प्रत्यक्ष अनुभवलेल्या क्रांतिसिह नाना पाटील या माणसातल्या देवाचं विस्मरण त्यांना कधीही होणार नाही.

संपत मोरे
९४२२७४२९२५

# समाजासाठी चांगले करण्याची जाणीव ठेवून काम केले पाहिजे-डॉ. हेमंत वैद्य

## खोलेश्वर महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

अंबाजोगाई/प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही वेगळे ध्येय घेऊन काम करणारी संस्था आहे. काही संघ स्वयंसेवकांनी स्थापन केलेली ही संस्था त्यांच्याच प्रेरणेने आजही राष्ट्रनिर्मिती करण्याचे कार्य करत आहे. त्यांचाच आदर्श समोर ठेवून आपणही समाजासाठी काहीतरी चांगले कराण्याचे व्रत घेतलेले आहे याची जाणीव ठेवून आपण काम केले पाहिजे असे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी केले.ते येथील खोलेश्वर महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आयोजित आचारसंहिता विषयक कार्यशाळेत उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप, संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे , खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह




किरण दादा कोदरकर , प्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन व देवी सरस्वतीचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की, समाज मनावर चांगले संस्कार करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. समाजामध्ये स्वदेशाविषयी, स्वसंस्कृती विषयी अभिमान बाळगून विद्यार्थ्यांमध्ये तो रूजावा यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पुढे गेले पाहिजे असे त्यांनी सांगितले. या चर्चासत्राच्या प्रथम सत्रात डॉ. दीपक फुलारी यांनी महाविद्यालयाची आचारसंहिता या विषयाची मांडणी केली. विषय मांडणी करत असताना ते म्हणाले की, वर्तनाची संकलित नियमावली म्हणजे आचारसंहिता. एखाद्या संस्थेतील कर्मचाऱ्यांनी कसे वर्तन करावे , काय टाळावे हे आचारसंहितेच्या माध्यमातून कळत असते. आचारसंहिता म्हणजे त्या संस्थेच्या संस्कृतीचा आरसा असतो. असे सांगून त्यांनी महाविद्यालयीन आचारसंहिता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात संस्थेची आचारसंहिता या विषयाची मांडणी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक व्यवस्था समितीचे कार्यवाह किरण कोदरकर यांनी केली. विषय मांडत असताना ते म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर भारतीयत्वाचा विचार समाजामध्ये रुजला पाहिजे यासाठी आपली शिक्षण संस्था उभारली गेली. येथील परंपरांची,मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी , राष्ट्रीय विचारांची पिढी तयार व्हावी व राष्ट्रीय चारित्र्य निर्माण व्हावे यासाठी आपण कायम प्रयत्नशील असले पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले.

तृतीय सत्रात संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे यांनी प्रशासकीय आचारसंहिता या विषयाची मांडणी केली. विषय मांडणी करताना ते म्हणाले की, विद्यार्थ्याला अभ्यासाची गोडी लागावी यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले पाहिजेत व विद्यार्थ्यांना आपल्या सहवासात आणले पाहिजे. सहवासातून अनौपचारीकरित्या विद्यार्थी अनेक गोष्टी शिक्षकाकडून शिकत असतात. असे सांगून त्यांनी महाविद्यालयीन प्रशासनात कोणत्या कोणत्या फाइल्स कशा पद्धतीने अद्ययावत ठेवल्या पाहिजेत तसेच छ––उ विषयी कशा पद्धतीने तयारी केली पाहिजे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात रामभाऊ कुलकर्णी म्हणाले की, समाजाला वेगवेगळ्या क्षेत्रातील चांगले उच्च कोटीचे मनुष्यबळ पुरविण्याचे कार्य भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आजमितीपर्यंत करते आहे. संस्थेचे जे देशभक्त, चारित्र्यवान नागरिक घडविण्याचे उद्दिष्ट आहे त्यासाठी हा ज्ञानदानाचा यज्ञ अविरतपणे चालू आहे त्यामुळे यात प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून काम केले पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यशाळेतच संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे यांना नवभारत वृत्तपत्र समूहाच्या वतीने देण्यात येणारा 'नवभारत एज्युकेशन अवार्ड' प्राप्त झाल्याबद्दल आणि त्यांची बीड शहरातील नामांकित चंपावती शिक्षण संस्थेच्या सभापती पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. गौतम गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. बिभिषन फड यांनी केले. कार्यक्रमाचे आभार उपप्राचार्य प्रा.आनंद पाठक यांनी मानले तर वैयक्तिक पद्य व शांती मंत्र प्रा. शैलेश पुराणिक यांनी सादर केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती

# पणन विषयक कार्यशाळेचे उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते उदघाटन

माजलगाव/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (एन.आय.पी.एच.टी. ) तळेगाव दाभाडे जि.पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ जुन २०२५ रोजी जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक मंडळ व सचिव यांचेसाठी पणन विषयक एक दिवसीय कार्यशाळेचे उदघाटन उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजलगाव बाजार समितीचे संचालक भगवान आगे,अमोल जाधव,नंदकिशोर सजगने,आबाजी भोसले,सचिव



एच. एन.सवने, नितीन पौळ,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे,उपनिबंधक सचिन घोडके, उपसरव्यवस्थापक महादेव बरडे, गोपालकृष्ण परदेशी उपस्थित होते.राज्यातील बहुतांश बाजार समितीच्या निवडणुका नुकत्याच पार पडलेल्या असल्याने नवीन संचालक मंडळ कार्यरत झालेले आहे. कार्यशाळेच्या सुरुवातीला मंत्री जयकुमार रावल यांचा नुतन संचालकांसाठी शुभसंदेश भाषणाची क्लीप सर्व उपस्थितांसमोर प्रसारित करण्यात आली. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे यांनी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील कृषी उत्पादने व नियमन, गोपालकृष्ण परदेशी यांनी कलम ३७ अन्वये बाजार समिती फी चा उपयोग व बाजार समितीवर आव्हाने आणि उपाययोजना, सचिन घोडके यांनी बाजार समितीचे गुणक्रमांक पध्दती, महादेव बरडे यांनी कृषि पणन विषयक विविध योजना या विषयांवर उपस्थित पदाधिका–यांना सखोल मार्गदर्शन केले.कार्यशाळेत समृत जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेसाठी महादेव बरडे, तळेगाव दाभाडे येथील अधिकारी राजेश नाफडे, अजय नागवडे, बाजीराव दगडे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आगमना निमित्त पाटोद्यात 'सजावट'; पण वास्तव वेगळंच

पाटोदा/प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकारी साहेबांचा तहसील कार्यालय पाटोदा येथे नुकताच दौरा झाला. त्यांच्या आगमना निमित्त तहसील कार्यालयात अचानकच साफसफाई, रंगरंगोटी आणि सजावटीचा धडका दिला गेला. एरवी गोंधळ, अस्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीने त्रस्त असलेले हेच कार्यालय एका दिवसात 'चकाचक' करण्यात आलं. सामान्य नागरिकांच्या मते, हे केवळ एक 'दिसावं तसं' रूप होतं – कारण प्रत्यक्षात कार्यालयीन कारभार व कर्मचारी उपस्थिती विषयी तक्रारी सातत्याने येत असतात.

पण जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीच्या वेळी सर्व काही सुरळीत असल्याचं चित्र उभं करण्यात आलं. यावेळी जिल्हा परिषद जरेवाडी शाळेला भेट देण्यात आली, जी पूर्वनियोजित असल्याचं स्पष्ट होते कारण तर याच पाटोदा तहसील कार्यालयाच्या शेजारी असलेली जिल्हा परिषद शाळा गेल्या काही



वर्षांपासून बंद आहे – हे प्रशासनातील कोणाच्याच लक्षात आलं नाही. तसंच पाटोद्यातील जिल्हा परिषद कन्या शाळेत शिक्षकांची कमतरता असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे यावर शिक्षण विभाग प्रशासनाच्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष का करते असे प्रश्न पत्रकारांनी विचारताच यावर जिल्हाधिकाऱ्यांनी मला जास्त माहिती नाही म्हणून उत्तर देणं टाळले तसेच काही नागरिक जिल्हाधिकाऱ्याकडे आपली तक्रार घेऊन आले मात्र त्यांना योग्य उत्तर नाही मिळाल्याने असमाधानी होऊन वापस गेले यावर एक नागरिकांनी प्रतिक्रिया दिली प्रशासनासमोर खोटं चित्र सादर केलं जातं आणि खरी अडचण मुळातूनच लपवली जाते, या प्रकारामुळे 'कागदोपत्री विकास' आणि 'खऱ्या अडचणींची' दरी पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# महिलोन्नतीसाठी शिक्षण आवश्यक : सय्यद

अंबाजोगाई/प्रतिनिधी



येथे १७ जून २०२५ रोजी राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोजित उच्चस्तरीय आढावा बैठकीत महिलांच्या समस्या आणि उपाययोजनांवर सखोल विचारमंथन झाले. मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, महिला व बालकल्याण अधिकारी तसेच विविध महिला संघटना उपस्थित होत्या.

ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष सय्यद एस.बी. यांनी महिलांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली. त्यांनी ऊसतोड कामगार महिलांच्या स्थलांतरामुळे शिक्षण, आरोग्य, बालविवाह, बळजबरी गर्भपात, गर्भपिशवी काढणे यांसारख्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. महिलांना मोफत व दर्जेदार शिक्षण, गावाजवळ वसतिगृहे, आरोग्य सेवा, बिनव्याजी पतपुरवठा, व्यवसाय प्रशिक्षण आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी हे उपाय सुचवले. अश्लील चित्रपट व अनैतिक व्यापारावर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली. महिलांना शिक्षण, आत्मविश्वास आणि सामाजिक समानता मिळाली पाहिजे, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. या मांडणीला सर्व उपस्थित मान्यवरांनी भरभरून प्रतिसाद दिला. अध्यक्षांनी जिल्हास्तरावर नियमित बैठक घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीचा दिवस महिलोन्नतीसाठी निश्चितच मोलाचा ठरल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

# जयमहेश कारखान्या मार्फत गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण शिबिर

माजलगाव/प्रतिनिधी

एन एस एल शुगर लिमिटेड युनिट ३ जय महेश पवारवाडी ,एन एस आय कानपूर, ऍडव्हान्टा कंपनी, आय. सि.ए.आर–आय.आय.एम. आर,बी.पी.सि.एल.यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्रातील पहिलाच व्यावसायिक प्रकल्प अंतर्गत गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १९ जुन गुरुवार रोजी घेण्यात आला त्यामध्ये कंपनीच्या वतीने पुढील प्रमाणे माहिती/प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात आली .

गोड ज्वारी लागवड प्रशिक्षण कार्यक्रमानिमित्त पंचक्रोशीतील ३०० शेतकऱ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला डव्हान्टा कंपनीचे मुख्य प्रतिनिधी पांडुरंग पाटील यांनी स्वीट स्वारगम गोड




ज्वारी लागवडी विषयी सखोल माहिती दिली यामध्ये त्यांनी ज्वारी लागवड पद्धत कीड व रोग नियंत्रण अंतर मशागत तसेच पाण्याचे व्यवस्थापन याबद्दल सर्व शेतकऱ्यांना माहिती सांगितली एन एस एल शुगर्स लिमिटेड जयमहेश पवारवाडी कारखान्याचे जनरल मॅनेजर पारसनाथ जयस्वाल यांनी गोड ज्वारीपासून इथेनॉल निर्मिती होणार आहे याबाबत माहिती सांगितली या ज्वारीपासून शेतकऱ्यांना उत्पन्न देखील चांगले मिळते हे पीक ९० ते १०० दिवसाचेच असून शेतकऱ्यांनी याचा फायदा घ्यावा व ए.जी.एम. दत्तात्रय आहेरकर, ऊस पुरवठा अधिकारी रामभाऊ सोळंके,भास्कर फपाळ यांनी देखील गोड ज्वारी लागवडी संदर्भातील माहिती शेतकऱ्यांना दिली व उपस्थित शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर त्यांना माहिती दिली अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात चांगला कार्यक्रम पार पडला.

# तिंतरवणी गावात रक्तरंजित हाणामारी!

गेवराई/प्रतिनिधी

तिंतरवणी येथे कौटुंबिक वादातून झालेल्या मारहाणीच्या घटनेत परस्पर तक्रारींवरून चकलांबा पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या तक्रारीत दिलीप महादेव खेडकर यांनी नितीन प्रभाकर खेडकर, विशाल उर्फ बाबुराव प्रभाकर खेडकर, प्रभाकर हरीभाऊ खेडकर, महेश ज्ञानेश्वर खेडकर आणि ज्ञानेश्वर हरीभाऊ खेडकर यांच्याविरुद्ध तक्रार दिली. दुसऱ्या तक्रारीत नितीन प्रभाकर खेडकर यांनी विष्णू महादेव खेडकर, दिलीप महादेव खेडकर, मधुकर महादेव खेडकर आणि वैभव दिलीप खेडकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.दिनांक १७ जून २०२५ रोजी दुपारी ३ वाजता तिंतरवणी शिवारातील शेतात दिलीप आणि त्यांची पत्नी संगीता खुरपणी करत असताना नितीन याच्याशी ट्रॅक्टरच्या उधारीवरून वाद झाला. यातून नितीन, विशाल, प्रभाकर, महेश आणि ज्ञानेश्वर यांनी दिलीप यांना लोखंडी गजाने आणि चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. दिलीप यांचे वडील आणि मधुकर यांनाही मारहाण आणि धमक्या मिळाल्या. दुसऱ्या तक्रारीनुसार, त्याच वेळी नितीन, त्यांचे वडील, आई आणि विठ्ठल कुडुक शेतात काम करत असताना विष्णू यांनी वाद घालून शिवीगाळ केली. त्यानंतर दिलीप, मधुकर आणि वैभव यांनी नितीन, महेश, प्रभाकर आणि सत्यभामा यांना मारहाण करून धमक्या दिल्या. दोन्ही घटनांमध्ये जखमींवर चकलांबा आणि बीड येथील रुग्णालयांत उपचार करण्यात आले. या प्रकरणी चकलंबा पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी दोन गुन्हे दाखल करण्यात आले पुढाव तपास पोह. घन:श्याम माल्हारी केदार हे करत आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळ्याला राहुल गिरींचे व्याख्यान

वडवणी।प्रतिनिधी

वडवणी शहरातील,नामांकित चौंडेश्वरी कोचिंग क्लासेच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व विद्यार्थी–पालक मेळाव्याला महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न.याबाबत अधिक माहिती अशी की,वडवणी शहरातील शिक्षण क्षेत्रात नामांकित असलेल्या चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व भव्य विद्यार्थी पालक मेळाव्याला प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान रविवार दि.१५ जून २०२५ रोजी चौंडेश्वरी मंगल कार्यालय,श्रीराम मंदिर चौक, वडवणी या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.श्री.भारतजी जगताप तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुलजी गिरी तसेच ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम ए.पी.आय. पो.स्टे.वडवणी, क्लासेसचे संचालक तुकारामजी दिवटे सर व संचालक सुरज टोंपे सर,सौ.फासे मॅडम आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गुणवंत




विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह सन्मानपत्र व बुके देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त त्या म्हणाले की,चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसने आज या ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव करून त्यांच्या पाठीवर टाकलेली कौतुकाची थाप त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरेल त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न झाले त्यांनी विद्यार्थी पालकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले वडवणी तालुक्यामध्ये शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटवण्याचे काम चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसचे संचालक सुरज टोंपे सर व तुकाराम दिवटे सर करत आहेत एन.एम.एम. एस.शिष्यवृत्ती परीक्षेत त्यांच्या विद्यार्थ्यांनी बीड जिल्ह्यात रेकॉर्ड केला आहे तसेच स्कॉलरशिप परीक्षा बी.टी.एस.परीक्षा,मंथन परीक्षा,सैनिकी स्कूल परीक्षा, इयत्ता–१० वी बोर्ड परीक्षेत चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे असे ते म्हणाले त्यानंतर अध्यक्षीय समारोप पर भारतजी जगताप यांनी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून टोंपे सर व दिवटे सर करत आहेत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे,पालकांचे,मार्गदर्शक सरांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संचालक श्री.सुरज टोंपे सर यांनी केले तर सूत्रसंचालन श्री. अमोल राठोड यांनी केले व उपस्थितांचे आभार संचालक श्री.तुकाराम दिवटे यांनी मानले. या कार्यक्रमाला गुणवंत विद्यार्थी तसेच पालक,सामाजिक,राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराईत जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांचा पदाधिकाऱ्यांकडून सत्कार



गेवराई :/प्रतिनिधी

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी शहरातील न्यू निसर्ग हॉटेल येथे सदिच्छा भेट देवून विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी त्यांचे शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे यांनी स्वागत केले. यावेळी शिनूभाऊ बेदरे, दिलीप गिरे, आबा गायकवाड, शंकर वैद्य, आकाश गिरे, माऊली बेदरे, ओम गायकवाड, नंदकुमार जोगदंड सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

गेवराई येथील शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे यांच्या हॉटेल न्यू निसर्ग येथे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सदिच्छा भेट देवून यावेळी त्यांनी शिवसेनेच्या पक्षवाढी संदर्भात चर्चा करुन अनेक नव्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान यावेळी त्यांचे तालुक्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी शहरातील शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी उच्च प्रतीचे सिमेन वापरून घरीच दुधाळ गाई तयार कराव्यात : आ.सुरेश धस

आष्टी/प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था ही दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे. आष्टी तालुक्याने दुग्ध व्यवसायात मोठ्या प्रमाणात क्रांती करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने उच्च प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई तयार करण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले. आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित आष्टी यांच्या वतीने मोरेश्वर मंगलकार्यालय येथे दूध उत्पादक शेतकरी चर्चासत्र व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पुढे बोलताना आ. धस म्हणाले की,आष्टी तालुक्यामध्ये दुधाळ गाईंची संख्या कमी प्रमाणात आहे .ती संख्या वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई (कालवडी )तयार कराव्यात .त्याचप्रमाणे घरी तयार केलेल्या गाईचा औषधोपचार खर्चही कमी असतो. जनावरांचा आजार खर्च कमी करण्यासाठी गोठा स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे.प्रत्येक शेतकऱ्याने गोठा आठवड्यातून एकदा तरी निर्जंतुक करणे आवश्यक आहे.

तसेच मुरघास करण्यासाठी बॅगचा वापर न करता जमिनीवर हौद करून मुरघास केल्याने त्यावर बुरशी येत नाही व मुरघास खराब होण्याचे प्रमाण अत्यल्प असते.यासाठी शेतकऱ्यांनी जमिनीवर हौद करूनच उच्च दर्जाची मका वापरून कणसासहित मकाचा मुरघास करणे गरजेचे आहे. या कार्यशाळेत डॉ.जालिंदर वांढरे, डॉ. संतोष गवारे, डॉ. मंगेश ढेरे डॉ.  बाबासाहेब कुंभार, डॉक्टर संदीपशिंदे, डॉ. धनंजय राजगुडे डॉ. शशिकांत कारखेले या




पशुवैद्यकीय डॉक्टर व पशुधन विकासअधिकाऱ्यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये दुधाळ गाईची निवडकरणे, पशु आहार व्यवस्थापन करणे, जनावरांचे घरगुती प्राथमिक उपचार व आयुर्वेदिक उपचार करणे, वंध्यत्व निवारण व दुबार ए.आय. करण्याचे कारणे व उपाययोजना, वंशावळ सुधारणा कृत्रिम रेतन वस्वार्टेड सिमेंन्सवर मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे,दिनकर दाणी मामा,मोहन झांबरे सर्व संचालक मंडळ तालुक्यातील सर्व छोटे मोठे व मध्यम दूध उत्पादक शेतकरीदूध संकलन करणारे चेअरमन महिला दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शिरूर येथे शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे उत्साहात

शिरूर

शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिरूरकरांनी उत्साहात आणि भव्य स्वरूपात स्वागत केले.नगर जिल्ह्यातील मुंगुसवाडे येथील मुक्काम केल्यानंतर संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे बीड जिल्ह्याच्या सीमेवर आगमन झाले.दहिवंडी येथील ग्रामस्थांनी स्वागत करून पालखीला वाट लावल्यानंतर शिरूरकर मोठ्या संख्येने स्वागताला उभे होते.शहराच्या हद्दीत प्रवेश केल्यानंतर प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांनी संत एकनाथ महाराजांच्या पादुका आणि पालखी प्रमुख गोसावी महाराज यांना पुष्पहार घालून नगरीच्या वतीने स्वागत केले.त्यानंतर ग्रामस्थांनी पालखीला खांदा देऊन परंपरेप्रमाणे पालखी वाजत गाजत मारुती मंदिरात भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली.या वेळी शहरातील आबालवृद्धांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दर्शन घेतले.

मुस्लिम बांधवांनी केली फराळाची व्यवस्था* शहरातील फळविक्रेते जमीर आणि समीर बागवान यांनी दिंडीतील भाविकांना फराळाची व्यवस्था केली होती.या वेळी दिंडीतील उपस्थित भाविकांना जवळपास दिड क्विंटल साबुदाणा खिचडी आणि केळीचे वाटप करण्यात आले.आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने दिंडीतील भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.या वेळी १४२ भाविकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषध,गोळ्यांचे वाटप करण्यात आले.वैद्यकीय अधिकारी डॉ.पूजा मस्के यांच्यासह मृणाली घुगे,समुदाय आरोग्य अधिकारी प्रविण भोंडवे,तालुका आरोग्य निरीक्षक व्ही. आर.लातूरकर,आरोग्य सहाय्यक बाबुराव जाधव,अमोल पाटील,महेश बडे,निशिकांत खाडे,आरोग्यसेविका कल्पना माने,अश्विनी सारूक,राजश्री डमाळे वाहनचालक प्रकाश सुळ यांची या वेळी उपस्थिती होती. संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे आगमन झाल्यानंतर शहरातील रोकडे परिवाराच्या वतीने पायघड्या घालण्याची परंपरा आजही कायम आहे.बाळाजी रोकडे यांच्यानंतर स्वर्गीय धोंडीराम रोकडे आणि त्यांचा मुलगा रमेश याने आपली पुढची पिढी सचिन रोकडे यांच्याकडे हि पिढीकडे सोपविली आहे.

# २५ वर्षांपूर्वीच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा उत्साहात

## स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा, माजी शिक्षकांचा भावनिक सन्मान

परळी

श्री वैद्यनाथ विद्यालय, परळी येथील सन २००० सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी २५ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहमेळावा आयोजित केला. आज रविवार, दिनांक २२ जून २०२५ रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या खास कार्यक्रमात जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला. एकेकाळी एकत्र शाळेच्या बाकावर बसणारे वर्गमित्र, आज विविध क्षेत्रात स्थिरावलेले असून, अनेकांनी व्यवसाय, पत्रकारिता, शासकीय सेवा, शिक्षण, वैद्यकीय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते माजी शिक्षकांचा सन्मान समारंभ. विद्यार्थ्यांनी आपल्या आदरणीय शिक्षकांना शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. शिक्षकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा समोर पाहून, आज पुन्हा वर्ग भरल्यासारखे वाटले, असे भावनिक उद्गार काढले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर सामूहिक प्रार्थना व स्वागतगीत सादर करण्यात आले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपापली ओळख, सध्याची व्यावसायिक स्थिती व शालेय काळातील आठवणी शेअर करताना वातावरण अगदी भावनिक झाले. वर्गातील काही विद्यार्थ्यांनी शाळेतील विनोदी प्रसंग, गमतीदार आठवणी रंगवून सांगितल्या, ज्यामुळे उपस्थितांमध्ये हास्याचे क्षण रंगले.कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये काही विदेशात कार्यरत असून, त्यांनी ऑनलाइन स्वरूपात सहभागी होत आपले मनोगत व्यक्त केले. हे पाहून स्नेहमेळाव्याचे आयोजन अधिक संस्मरणीय ठरले.

या मेळाव्यासाठी विशेष आकर्षण म्हणून शाळेचा वर्गजमवून 'क्लासरूम सीन' तयार करण्यात आला होता. काही माजी शिक्षकांनी त्या वर्गात पुन्हा एकदा थोडक्यात शिकवणी सत्र घेतले, जे क्षण अक्षरशः सर्वांच्या आठवणीत कायमचे कोरले गेले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेत एकमेकांशी पुन्हा संवाद साधला. या स्नेहमेळाव्यामुळे आपल्या सर्वांच्या नात्यांना नव्याने बहर मिळाला, असे अनेकांनी व्यक्त केले. भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम दर ५ वर्षांनी आयोजित करण्यात यावेत, असा निर्धार या सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात आला. या यशस्वी आयोजनामागे आयोजन समितीतील श्री.श्रीकांत रंगनाथ खके, सौ.रुपाली सूर्यकांत कापसे (वाकडे ) श्री.सचिन  बापुराव डाके यांचा मोलाचा सहभाग होता. सर्व उपस्थितांनी एकमुखाने या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.दरम्यान, या स्नेहमेळाव्यात २०००-२००१ बॅचच्या मयत झालेले गुरूवर्य शिक्षक कै.शिवाजीराव देशमुख सर, कै.प्रभाकर बेंबळकर सर, कै.वैशाली बेंबळकर मॅडम, कै.वि.ना.स्वामी सर, कै. अनंतराव देशमुख सर, कै.म.ग.कुलकर्णी सर, कै.अंकुशराव देशमुख सर, कै. चंद्रकांतराव देशमुख सर, कै.महादेवअप्पा खोत सर, कै.रामचंद्र वाघमारे सर, कै. प्रल्हाद जोगदंड सर, कै.अश्फाक बेग सर व मयत झालेले वर्गमित्र कै.निसर्ग देशपांडे, कै.गणेश गरूड, कै.अशोक देशमुख, कै.अंकुश देशमुख, कै.रवि बोले, कै.शंकर मस्के, कै.भानुदास बागवाले, कै.गोपाळ फुलझळके, कै.नंदकुमार वाईंगडे यांना उपस्थित शिक्षकवृंद व माजी विद्यार्थ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# गुऱ्हाळाकडील ऊसाचे पैंसे सहा महिन्यापासुन येईनात

## ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकरी हवालदिल; शेकाप करणार हलगी बजावो आंदोलन

माजलगाव/प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकरी पेरणीच्या तोंडावर आर्थिक संकटात सापडलेला असून हवालदिल झाला आहे तर दुबार पेरणीचे संकट समोर उभे असतानाही रूपा माता गुऱ्हाळा कडून सहा महिन्यापासून शेतकऱ्याच्या उसाचे पैसे थकीत असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून शेकापचे ॲड नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार आहे.

माजलगाव तालुक्यातील प्रत्येक वर्षी हीच रित असून सहा सहा महिने वर्ष वर्षे शेतकऱ्यांना उसाच्या पैशासाठी उंबरठे शिजवायला लावणाऱ्या रूपामाता गुराळाच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करून गुराळाच्या जमिनीसह गुऱ्हाळाचा लिलाव करून शेतकऱ्याचे पैसे अदा करावेत अशी मागणी शेकापच्या वतीने  उपजिल्हाधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की,रोषनपुरी येथील रुपामाता गुर्हाळाकडुन प्रत्येक वर्षी सुरुवातीच्या पंधरा दिवसाचे बिले दिली जातात त्यानंतर शेतकऱ्यांना बिलासाठी सहा सहा महिने गुर्हाळाचे उंबरठे झिजवावे लागतात. ऐन पेरणीच्या तोंडावर व दुबार पेरणीचे संकट घोंगावत असतांनाही रूपामाता गुराळ शेतकऱ्यांचे ऊस बीलाची रक्कम देण्यास तयार नाही. शेतकऱ्यांचे थकीत बिलाची रक्कम तात्काळ द्यावी यासाठी शेकापच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयावर दि.२४ जुन मंगळवार रोजी हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार असुन प्रशासनातील अधिकारी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करतात पण कठोर कारवाईचे पाऊल उचलत नाहीत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापिही खपवून घेणार नाही तर गुऱ्हाळाच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करून गुर्हाळाची जप्ती करण्यात यावी व त्याचा कायदेशीर लिलावातुन ऊसाची थकीत  रक्कम द्यावी या मागणीसाठी २४ जुन रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार आहे तरी ऊसाचे पैसे थकीत असणार्या शेतकरी बांधवांनी शेकडो च्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी नेते भाई नारायण गोले पाटील यांनी केले आहे.

# आ.सुरेश धस यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्याचा सत्कार



आष्टी /प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघातील शैक्षणिक व विविध क्षेत्रांत आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर जिद्द आणि चिकाटी दाखवत भरारी घेऊन यश संपादन करत आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या विद्यार्थी व पालक यांचा आमदार सुरेश धस यांनी आष्टी येथे अद्वैतचंद्र निवासस्थानी सत्कार करत अभिनंदन केले.

यामध्ये आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथील विशाल शेकडे या युवकाची आर्मी लेफ्टनंट या पदी नियुक्ती झाले.पाटसरा येथील राहुल ज्ञानदेव सांगळे यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये  दुय्यम अभियंता या पदावर  नियुक्ती झाले. शिरूर तालुक्यातील वारणी येथील जयेश सुभाष केदार याला (५४७ गुण),संकेत सोमनाथ केदार (५२४ गुण),प्रमोद सुरेश डोंगरे (५२० गुण) या विद्यार्थ्यांनी छएएढ परीक्षेत यश संपादन करून ते चइइड साठी पात्र झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी सत्कार करून अभिनंदन केले. त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सभापती रमजान तांबोळी, सभापती बाळासाहेब केदार, एन.टी.गर्जे भाऊ,चेअरमन आदिनाथ सानप,रंगनाथ धोंडे,बाळू शेठ मेहेर,रामशेठ मधूरकर, आत्माराम फुंदे,प्रशांत गर्जे,राहुल गर्जे, यांच्यासह पालक ,नागरिक आदी उपस्थित होते.

# विज्ञान शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यकासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

अंबाजोगाई/प्रतिनिधी

मराठी विज्ञान परिषद मुंबई, पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र आणि मराठी विज्ञान परिषद अंबाजोगाई व गटशिक्षण कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रात विज्ञान शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यकासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.३,४,५जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५या कालावधीत संपन्न होणार आहे. या कार्यशाळेस मार्गदर्शनासाठी मराठी विज्ञान परिषद, मुंबई येथून विज्ञान अभ्यासक व तज्ञ व्यक्ति मार्गदर्शन करणार आहेत. यातून विज्ञान शिक्षक व सहाय्यक यांच्या साठी अवघड प्रयोगांची मांडणी,साहित्य सूची, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्रतील उपकरणे हाताळणी व निगा यांचे सखोल मार्गदर्शन लाभणार आहे. प्रयोगशाळा सुरक्षा,अग्नि सुरक्षा, रसायन व भौतिकशास्त्रांचा परिचय जीवशास्त्र नमुने व निरीक्षण या विषयावर सांगोपांग चर्चा होणार आहे. एकूणच विज्ञान पूरक संकल्पना, मांडणी व विवेचन या विषयावर मार्गदर्शक आपली मते मांडणार आहेत. प्रयोगशाळा सहाय्यक व विज्ञान शिक्षकांनी संयोजक प्रतिनिधी डॉ. संकेत तोरंबेकर, प्रा. आदित्य कदम, डॉ. उमराव शेप यांच्याशी संपर्क साधण्याचे अवाहान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे व मराठी विज्ञान परिषद शाखा अंबाजोगाईचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर व सचिव प्रा.भीमाशंकर शेटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने श्री संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत!

बीड/प्रतिनिधी

श्रीक्षेत्र मुक्ताई नगर येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवलेल्या श्री संत मुक्ताई यांच्या पालखी सोहळ्याचे रविवार दि.२२ जून रोजी बीड शहरात आगमन झाले. यावेळी सुभाष रोड येथील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने या पालखी सोहळ्याचे ढोल-ताशा, फटाक्याची आतिषबाजी आणि वारकर्यांना आल्पोपहार देवून बीड शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने व अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी भव्यदिव्य स्वागत केले. श्री संत मुक्ताई यांच्या पालखीची महाआरती झाल्यानंतर पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज, सुधाकर महाराज, आचार्य अमृताश्रम महाराज व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

श्री संत मुक्ताई यांची पालखी गत ३१६ वे वर्षापासून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. गेल्या अनेक वर्षी पासून श्री संत मुक्ताईंची पालखी ही शहरात मुक्कामी असते. आज रविवार दि.२२ जून रोजी पालखी सोहळ्यातील वारकर्यांचे बीड शहरात आगमन झाले असता सुभाष रोडवरील आदर्श




मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने भव्य दिव्य स्वागत केले. साठे चौक ते माळीवेस चौका पर्यंत मनमोहक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दरवर्षी प्रमाणे आदर्श मार्केट व्यापारी संघटनेकडून वारकर्यांना आल्पोपहार दिला गेला. त्यानंतर पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प.हरणे महाराज व सुधाकर महाराज, रविंद्र पाटील, आचार्य अमृताश्रम महाराज, डॉ. सारिकाताई क्षीरसागर, शहर पोलीस ठाण्याचे पी.एस.आय. कुमावत, पी.एस.आय.जाधव, पीएसआय वाळके, सानप, संपादक दिलीप खिस्ती, संपादक सुनील क्षीरसागर, व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोकराव शेटे, सचिव तुकाराम साळुंके, पत्रकार अनिल भंडारी, प्रा.लक्ष्मीकांत बाहेव्हाणकर, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, ॲड.संदीप बेदरे, मंगेश निटुरकर, प्रमोद जोशी, आनंद डोंगरे, आत्माराम वाव्हळ, कृष्णा शिंदे, यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री संत मुक्ताईंच्या पादुकांची महाआरती करण्यात आली.

यावेळी आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर, सचिव सुदाम चव्हाण, उपाध्यक्ष महेबुब शेख, गणेश मुळे, महेंद्र दुगड, हनुमान पाचंग्रे, दगडु म्हेत्रे, डॉ. रमेश कैवाडे, राजु ताठे, राजेश कानगावकर, विशाल मानकुस, आप्पा औताडे, अरुण देवधरे, मच्छिंद्र उपरे, मंगेश काळे, देविदास नेरे, ओंकार उपरे, शुभम पाखरे, अमोल पतंगे, देवीदास मसुरे, निलेश पतंगे, राम शिंदे, विनायक पतंगे, दत्ता जगताप, शिवाजी शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, हेंद्रे मामा, बाहेकर, दिपक पतंगे, मनोज पतंगे, गणेश उपरे, राहुल शिंदे, गणेश राऊत, ज्ञानेश्वर पंधारे, विनायक दुबाले, किरण वाघमारे, नारायण मानकुस, निलेश पतंगे, दत्ता उबे, बंटी कानगावकर, गणेश सुत्रे, देविदास मसुरे, लाला कानगावकर, आप्पा नरे, देविदास नेरे, दिपक घाडगे, अक्षय कानगावकर, कैलास उपरे, हरीभाऊ, सोमेश्वर कानगावकर, बप्पा घुगे, विनोद फटाले, राम मानकुस, गणेश राठोड, रवि वाघमारे, योगेश कानाडे, शुभम उपरे, सुग्रीव चव्हाण, यांच्यासह आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे सर्व पदाधिकारी, व्यापार्यांची उपस्थिती होती. सर्व व्यापारी बांधवांनी अल्पोपहार देवून वारकर्यांची सेवा करण्यासाठी बहुमोल परिश्रम घेतले.

# पावसाने फिरवली पाठ; शेतकरी सापडले अडचणीत

## दुबार पेरणीचे संकट कपाशीच्या क्षेत्रात वाढ

पट्टीवडगाव/प्रतिनिधी

मृग नक्षत्रात पावसाने दमदार हजेरी लावली होती त्यामुळे शेतकऱ्यांना शेताची मशागत व पेरणी सोबत करावी लागली बहुतांश शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे तर उर्वरित पेरण्या पावसाअभावी रखडल्या आहेत सुसाट वेगाने वारे वाहत असून जमीनितील ओलावा झपाट्याने कमी होत आहे त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे

जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दमदार पाऊस झाला शेतकऱ्यांनी कपाशी लागवड, सोयाबीन, तुरीची पेरणी केली पेरणी केल्यानंतर जोरदार पाऊस झाल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे सोयाबीन पिकाला उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे शेतकरी पर्याय शोधक आहे का ? शासनाने खरीप हंगामातील पिकांचे हमी भाव जाहीर केले त्याचा शेतकऱ्यांना कितपत फायदा झाला यावर्षी सोयाबीनचे खरेदी केंद्र सुरू केले नव्वद दिवसाचा अल्टीमेट दिला त्यानंतर सहा दिवसाची मुदत वाढ मिळाली खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर सोयबीनचा कचरा झाला बाजारपेठेत मनमानी भावाने खरेदी सुरू झाली सोयाबीन तुर मुग उडीद कापूस हरभरा धान्याची खरेदी केंद्र सुरू असतील तर शेतकऱ्यांना हमी भावाचा फायदा होईल अन्यथा बाजार पेठेत शेतकऱ्यांचा माल हमीभावाने खरेदी करावा लागेल नाहीतर शेतकऱ्यांची अशीच फरफट सुरु राहिल शेतकऱ्यांना दरवर्षी नवनविन संकटांना तोंड द्यावे लागत आहे खत बी बियाणे औषधी शेती उपयोगी वस्तूचे भाव दुप्पटीने वाढले गेल्या चार वर्षांपासून शेतीमालाचे भाव रेगाळत पडले आहेत दिवसेंदिवस वाढत चाललेला शेतीचा खर्च परवडत नसल्याने शाश्वत शेती करणे अवघड होत आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, मोहन दत्तु गुंड यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स एम.एस.सी.बी ऑफीस जवळ  माळीवेस ,बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक क्रांतीवीर कार्यालय, गुंड गल्ली केज ता.जिल्हा जि.बीड - ४३११२३ येथे प्रकाशीत केले आहे. मो ९४२३९७९४९२ Email- ID skrantiveer66gmail.com या अंकामध्ये प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही,वाद विवाद केज न्यायालय अंतर्गत. उपसंपादक आप्पासाहेब महानोर मो ९५११७१२५९२
This News paper's owner, printr, editor, Mohan Dattu Gund printed this at the Mauli Offset Printers, Near Office MSCB at Malives, Beed-431122. and published at Weekly Krantiveer Office, Gund Galli, Kej Tq. Kaij Dist Beed Bead-431123. Mob 9423979492, Email ID- skrantiveer66@gmail.com Editor is not totally agree or disagree with the news and articles this issue. Disputes under jurisdiction of Kaij court. Deputy Editor Appasaheb Mahanor, Mo-9511712592